**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. राधाकृष्ण अवधूत तपस्वी
३९३, कसबा पेठ, पुणे-११

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
बांधकाम नियंत्रण विभाग,
उप आयुक्त कार्यालय क्र.३, टिळक रोड,
पुणे महानगरपालिका, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७६७ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. राधाकृष्ण अवधूत तपस्वी
३९३, कसबा पेठ, पुणे-११

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता,
विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. शाम ढवळे

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम, नगर उपअभियंता

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १७.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.२.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मिळकत क्र.३९३ मधील नियोजित बांधकामाचा मान्य नकाशा प्रत, भोगवटा पत्र न घेता जागा वापरणे करिता दाखला मिळणेसाठी जो अर्ज केला त्यासोबतच्या प्रमाणित प्रती

## विवेचन

अपीलकर्ता श्री. राधाकृष्ण अवधूत तपस्वी यांनी मिळकत क्र.३९३, कसबा पेठ, पुणे मधील बांधकामाच्या नकाशाची प्रत मागितली होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने त्यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहिती बाबतची कागदपत्रे २५ दिवसात शोधून काढण्याबाबत व ती न मिळाल्यास रेकॉर्ड विभागातील संबंधितांवर कारवाई करणेबाबत आयोगाने आदेशित केले होते. मात्र अपीलकर्त्याची मुख्य मागणी करपात्र रकमेतील दुरूस्तीची असून ती प्रशासकीय कार्यवाहीची आहे.

दि. १५.१.२००९ रोजीचे पत्रान्वये जन माहिती अधिकारी यांनी असे अवगत केले आहे की बांधकाम विभागाशी संबंधित माहिती श्री. तपस्वी यांना देण्यात आली आहे. कर आकारणी व कर संकलन विभागाकडील माहिती देण्याबाबत कर संकलन प्रमुख यांना कळविले आहे.

कर संकलन यांचा अहवाल दि. २१.२.२००९ रोजी प्राप्त झाला आहे. श्री. तपस्वी यांना दि. १८.२.२००९ रोजी समक्ष माहिती दिली आहे. तसेच दि. १.४.२००७ पासून फेरआकारणी करून दुरूस्त करपात्र रकमेचे बील अपीलकर्त्यास दिले आहे, असे त्यात नमूद केले आहे. त्यानुसार आपली काही तक्रार राहिली नसल्याचे लेखी म्हणणे श्री. तपस्वी यांनी दि. २१.२.२००९ रोजी दिले आहे. मात्र ही मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये येत नाही. प्रशासकीय कार्यवाहीच्या मागणीसाठी माहितीच्या अधिकारात अर्ज करणे अयोग्य आहे, अशी समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २०.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८२५/ पुणे | श्री.विलास प्रभाकर रुद ५८७, बुधवार पेठ, पुणे-२ | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, ता.वेल्हा, जि.पुणे | अधीक्षक, भूमी अभिलेख, ता.वेल्हा, जि.पुणे | मौजे साईव बु.,ता.वेल्हे येथील गट नं.९५,९७ व १०१ मधील मोजणी कामी लागणारी सर्व कागदपत्राच्या सत्य प्रती मिळणेबाबत |

सदर अपिलामध्ये पूर्ण कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्याच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे ते अधिकृत म्हणून मान्य करता येणार नाही. तसेच कार्यवाहीची माहिती मागितली असली, तरी कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दिनांक :२८-०४ -२००९

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.श्रीकांत रामचंद्र प्रभू
श्री १९, संकल्प सहनिवास ५०, वेलस्ली रोड,
पाटील इस्टेट, शिवाजीनगर, पुणे-५ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १८४१ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.श्रीकांत रामचंद्र प्रभू
श्री १९, संकल्प सहनिवास ५०, वेलस्ली रोड, पाटील इस्टेट, शिवाजीनगर, पुणे-५

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता, विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ श्री.प्रविण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उपअभियंता, विकास योजना,
पुणे महानगरपालिका, पुणे-४११००५ श्री.अशित वेदप्रकाश जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.३.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १६.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २३.५.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांची मूळ मालकी असलेल्या स.नं.२१/४, १/४, भाग-५ बंडगार्डन रोड या जमिनीच्या झोन प्लानच्या संदर्भातील माहिती. ऊर्वरित मिळकतीबाबतची माहिती, सदर जमीन कोणत्या झोनमध्ये आहे | |

## विवेचन

श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांची मूळ मालकी असलेल्या बंडगार्डन पुणे येथील जागेच्या संदर्भात अपीलकर्ता श्री.श्रीकांत रामचंद्र प्रभू यांनी जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, विकास योजना, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. या जागेच्या नकाशावरील 'खुली जागा' (ओपन स्पेस) या नोंदीबद्दल अपीलकर्ता व महानगरपालिका यांच्यात मतभेद आहेत. अंतिम आराखडा व अंतर्गत आराखडा असे दोन नकाशे महापालिकेकडे आहेत. आर्किटेक्ट खांडेकर यांनी सादर केलेल्या तात्पुरत्या आराखड्याबद्दलचे पत्र आहे. हा आराखडा अस्पष्ट असून वाचण्याजोगा नाही. तसेच त्यावर जमीन मालकाची सही नाही. श्री.पटवर्धन यांच्या निधनानंतर सुमारे आठ-महिन्यांनी दि.१.१२.१९६५ रोजी या जागेचा आराखडा मंजूर करण्यात आला. त्यामध्ये खुली जागा दर्शविलेली नसून निवासी जागा असल्याचे नमूद आहे. झोनिंगमध्ये मात्र खुल्या जागेची नोंद हस्ताक्षरात केली आहे. आराखडा मंजुरीचे पत्र उपलब्ध होत नाही. हा आराखडा अधिकृत मानता येणार नाही, असे श्री.प्रभू यांचे म्हणणे आहे. त्यामुळे मान्य व अधिकृत

आराखडा आपल्याला मिळावा. दि.२३.९.१९५८ रोजी मंजूर केलेल्या आराखड्याची प्रत उपलब्ध नसल्यास जमीन मालकांनी (श्री.पटवर्धन यांनी) अगर त्यांच्या कुलमुखत्यारपत्रधारकांनी त्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रतीही आपल्याला देण्यात आलेल्या नाहीत, अशी श्री.प्रभू यांची तक्रार आहे. आपल्याला दिलेल्या दि.२०.२.२००८ रोजी दिलेल्या झोनिंग नकाशानुसार संबंधित जागा निवासी विभागात आहे, परंतु कोणी तरी 'खुली जागा' असे हस्ताक्षरात लिहिले आहे. कोणी तरी हितसंबंधी व्यक्तीने आराखड्यात ही खुली जागा असल्याचे नमूद करुन बेकायदेशीर बदल कागदपत्रात केला आहे, असे श्री.प्रभू व त्यांचे प्रतिनिधी चार्टर्ड आर्किटेक्ट श्री.पेशवे यांनी विविध कागदपत्रांमध्ये नमूद केले आहे. मूळ अर्जात व अपिलामध्येही तसे प्रतिपादन त्यांनी केले आहे. तेच प्रतिपादन त्यांनी आयोगापुढील सुनावणीत केले.

जागेच्या आराखड्यामध्ये ही खुली जागा आहे, त्या संदर्भातील सर्व कागदपत्रे श्री.प्रभू यांना देण्यात आली आहेत. जागेच्या अंतर्गत आराखड्यावर महापालिकेचे शिक्के नाहीत, सीसीए होऊन खुली जागा मंजूर आहे व त्याची प्रत श्री.प्रभू यांना देण्यात आली आहे, असे तत्कालीन व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले. श्री.प्रभू यांनी यापूर्वी तीनदा दि.५.१२.२००७, २५.२.२००८ व ७.५.२००८ रोजी माहिती मागितली व ती त्या त्या वेळी देण्यात आली. 'श्री.श्रीकांत प्रभू यांनी दि.१६.४.२००८ रोजी अपूर्ण माहितीबाबत अपील दाखल केले. अपिलाच्या सुनावणीसाठी दि.१६.५.२००८ रोजी संबंधितांस बोलाविण्यात आले. अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी होऊन संबंधितांस अपिलाचा निर्णय जा.क्र.नअजा:मा/३०३, दि.२३.५.२००८ अन्वये कळविला. अपिलार्थी श्री.श्रीकांत प्रभू यांचेतर्फे श्री.पेशवे, चार्टर्ड आर्किटेक्ट यांनी मागणी केलेल्या सि.स.नं.२१/४ व २१/५ बंडगार्डन येथील श्री.श्रीमंत चिंतामणराव पटवर्धन यांच्या मालकीच्या ऊर्वरित मिळकतीबाबतची माहिती व सदरची प्रॉपर्टी कोणत्या झोनमध्ये आहे, याबाबतची, तसेच अर्जात नमूद केलेल्या संपूर्ण माहितीबाबत त्यांना श्री.पात्रे यांनी खात्याकडील संपूर्ण फाईल श्री.पेशवे, चार्टर्ड आर्किटेक्ट यांना दाखवावी. उपलब्ध फाईलमधील आवश्यक असलेली संपूर्ण कागदपत्राच्या झेरॉक्स त्यांना त्वरित देण्यात याव्यात. या अपिलीय प्राधिकाऱ्यांच्या निर्णयाच्या

अनुषंगाने श्री.पेशवे, चार्टर्ड आर्किटेक्ट यांना संपूर्ण फाईल तपासणीसाठी दिली व त्या प्रकरणातील संपूर्ण झेरॉक्स दि.१६.५.२००८ रोजी हातोहात दिलेल्या आहेत,' असे अपिलीय प्राधिकारी श्री.प्रविण गेडाम व जन माहिती अधिकारी श्री.अशित वेदप्रकाश जाधव यांनी नमूद केले. झ ाोनिंगच्या संदर्भात दि.२४.३.२००८ रोजी श्री.प्रभू यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर उपअभियंता, (वि.यो.), पुणे महानगरपालिका यांनी पत्र पाठविले 'पुणे पेठ बंडगार्डन रोड सि.स.नं.२१/४ व २१/५ ही मिळकत शासनमान्य सन १९८७ च्या विकास आराखड्यामध्ये निवासी विभागात समाविष्ट आहे. पुणे महानगरपालिकेकडील जा.क्र.टीपीओ/५९०८, दि.१.१२.१९६५ या मान्य लेआऊटनुसार सदरची मिळकत मान्य लेआऊटमधील ओपन स्पेस दर्शविण्यात आलेली असल्याने त्याबाबतची टीप झोनिंगवर खात्याचे प्रचलित धोरणानुसार दर्शविण्यात आलेली आहे. ओपन स्पेसमध्ये विकास नियंत्रण नियमावलीनुसार बांधकाम १५टक्के अनुज्ञेय असल्याने खात्याने झोनिंगवर दर्शविलेली टीप खात्याचे प्रचलीत धोरणानुसार आहे,' असे कळविले असल्याचेही जन माहिती अधिकाऱ्यांनी संबंधित पत्राच्या प्रतीसह निदर्शनास आणले.

आर्किटेक्टमार्फत आराखडा सादर करुन त्याला मंजुरी देण्यात आली असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. मात्र मूळ जमीन मालकांच्या निधनानंतर आठ महिन्यांनी आराखडा बनावट कागदपत्रांच्या आधारे मंजूर केला असल्यामुळे तो अधिकृत नाही, म्हणून दिलेली माहिती चुकीची आहे, हा श्री.प्रभू यांचा दावा मान्य करता येणार नाही. संबंधित कागदपत्रे खरी की बनावट, आराखडा कायदेशीर की बेकायदेशीर हे ठरविणे हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही. मात्र 'निवासी जागा' व 'खुली जागा' या नोंदीमुळे दिसणाऱ्या विसंगतीबाबत स्पष्टीकरणात्मक माहिती जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, (वि.यो.), पुणे महानगरपालिका व अपिलीय प्राधिकारी तथा नगर उपअभियंता, (वि.यो.), पुणे महानगरपालिका यानी सुनावणीच्या दिनांकापासून ३ दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी, असा तोंडी आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार दि.१३.८.२००८ रोजी श्री.प्रभू यांना

स्पष्टीकरण देण्यात आल्याचे संबंधित पत्राच्या प्रतीसह अपिलीय प्राधिकारी तथा नगर उपअभियंता, (वि.यो.), पुणे महानगरपालिका यांनी दि.३०.८.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला कळविले.

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२२.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९२३/ पुणे | श्री.नंदकुमार दत्तात्रय चव्हाण बालाजी अपार्टमेंट, वडगाव बु.,सिंहगड रोड, फ्लॅट नं.एस ३०९, पुणे ४१ | व्यवस्थापक, श्री सहस्त्रार्जुन नागरी सहकारी पतसंस्था मर्या.१०९ महात्मा फुले पेठ, जन्नु अपार्टमेंट, सहस्त्रार्जुन कॉर्नर, पुणे-४२ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर, पुणे (१), स.नं.५८२ डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे २७ | माहे जानेवारी २००० ते २०.०२.२००३ या कालावधीच्या दैनंदिन खात्यावर (खाते क्र.६१७ व २१७७) जमा झालेल्या रक्कमेच्या अनुषंगाने माहिती |
| २ | १६८१/ पुणे | श्री.सुरेश नारायण रेगे मोहन प्रिंटरी १०५, १०६ व १०७ उद्योग मंदिर, नं.१, ७-सी भागोजी कीर मार्ग, माहिम, मुंबई १६ | उपनिबंधक (नागरी बँका) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | अप्पर आयुक्त, सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे | दि.०१.०१.१९९९ ते दि.३१.०३.२००६ या कालावधीत दि सारस्वत को.ऑप.बँक लि., मुंबई या बँकेच्या वसुली अधिकाऱ्यांच्या नियुक्तीसाठी सहकार आयुक्त कार्यालयाकडे पाठविलेली पत्रे, ठराव व त्या सोबतची बँकेने केलेल्या ठरावाची कागदपत्रे |
| ३ | १७०१/ पुणे | श्री.वासुदेव शर्मा अध्यक्ष, ऑल इंडिया ॲन्टी करप्शन कमिटी, काळेवाडी फाटा, पिंपरी, पुणे १७ | सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था (परसेवा), जिल्हा नागरी सहकारी | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे, जि.पुणे | दावा क्र. १०१/पी ९६/०७-०८ सांगली दि.१८.१०.२००७ मध्ये जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे, विभागीय कार्यालय, क्रांती चौक, नवी सांगवी या कार्यालयाच्या सही शिक्का मारुन |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | पतसंस्था फेडरेशन लि., पुणे, विभागीय कार्यालय, क्रांती चौक, नवी सांगवी, पुणे २७ | | काढण्यात आलेल्या समन्सच्या अनुषंगाने माहिती |
| ४ | २४५१/ पुणे | श्री.हुसेन सुलतान पी-१८, मंत्री अंगण, मुंढवा रोड, पिंपळेवस्ती, पुणे ३६ | व्यवस्थापक, वसंतदादा सहकारी बँक, सांगवी शाखा, पुणे ३० | कार्यकारी संचालक, वसंतदादा सहकारी बँक, सांगवी शाखा, पुणे ३० | मुदत ठेवीची रक्कम ठेवण्यात असलेले बचत क्र.२४४,२४७, २४८,२४९ व २५० बाबत माहिती |

**<u>विवेचन</u>**

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा नागरी सहकारी बँका / पतसंस्था यांना लागू नाही, असा निर्णय मुबंई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने रिटपिटीशन क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेला आहे. त्यानुसार वर नमूद केलेली अपिले दाखल घेण्यायोग्य ठरत नाहीत.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. नियंत्रक अधिकारी म्हणून सहकारी संस्थांची जी माहिती सहकार खात्याच्या संबंधित कार्यालयाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती त्या त्या कार्यालयांनी अर्जदारांना देणे बंधनकारक आहे. त्यानुसार या कार्यालयाने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. वरील अपिले अनुक्रमांक १ ते ४ (क्रमांक १९२३, १६८१, १७०१ व २४५१ ) निकाली काढण्यात येत आहेत.

पुणे
दि. ३-०४-२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चोथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २४.०२.२००९ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता :

| अक्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्यांचे नांव व पत्ता | जन माहिती अधिकारी यांचे नांव | अपिलीय प्राधिकारी यांचे नांव | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०५३/ पुणे | श्री.पंकज बबन निंबाळकर मु.पो.लासुर्णे, ता.इंदापूर, जि.पुणे | तालुका कृषी अधिकारी इंदापूर, ता.इंदापूर, जि.पुणे | उप विभागीय कृषी अधिकारी बारामती, ता.बारामती, जि.पुणे | माहे जानेवारी २००६ ते २००८ अखेर तालुक्यातील ग्रामसेवक पदाच्या सेवाविषयक बाबी संबंधात एकूण ६ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास विना शुल्क देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | २०४८/ पुणे | श्री.तानाती पांडुरंग रानवडे मु.पो.रुळे गावठाण, ता.वेल्हे, जि.पुणे | ग्रामसेवक, ग्रामपंचायत रुळे, ता.वेल्हे, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती वेल्हे, ता.वेल्हे, जि.पुणे | सन २००० ते २००७ या वर्षातील ग्रामपंचायतीचा दर वार्षिक जमा खर्च विकास कामे व ग्रामीण रोजगार योजना अंतर्गत आलेल्या अनुदानाच्या अनुषंगाने एकूण ६ मुद्यांची माहिती | आवश्यक ती माहिती आठ दिवसांत अपिलकर्त्यास देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | २०४४ / पुणे | श्री.नंदकुमार रामचंद्र जोशी ३१/६, राऊतबाग, अे-५, | गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, सासवड. | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पुरंदर, सासवड, | पुरंदर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकाच्या रिक्त जागा, अतिरिक्त | आवश्यक ती माहिती दि.१५.०३.२००९ पर्यंत देण्याचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | गुलाबनगर, दिशा नर्सिंग होम शेजारी, धनकवडी, पुणे -४३ | ता.पुरंदर, जि.पुणे | ता.पुरंदर, जि.पुणे | जागा, शिक्षण समायोजनाची कार्यवाही बदल्या३.११ मुद्यांची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | २१७७-अ/पुणे | श्रीमती शारदा सदानंद स्वामी द्वारा महेंद्र विठ्ठल मांढरे १४५,कोथरुड, पुणे-३८ | सह दुय्यम निबंधक वर्ग-२, हवेली क्र.१५, पाषाण, पुणे-२१ | नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उप नियंत्रक, पुणे विभाग, पुणे | मौजे बाणेर सर्व्हे नं.२६/३,२६/४ या दोन सर्व्हे नं.पॉवर ऑफ ॲथॉरटी डेव्हलप अग्रीमेंटची मूळ प्रत | आवश्यक ते विहीत शुल्क भरल्यानंतर माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | २८०५/ पुणे | श्री.नंदकुमार रामचंद्र जोशी ३१/६, राऊतबाग, अे-५, गुलाबनगर,, दिशा नर्सिंग होम शेजारी, धनकवडी, पुणे -४३ | गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वडगाव मावळ, ता.मावळ, जि.पुणे | दि.१६.०६.२००८ ते दि.२०.०९.२००८ या कालावधीतील मावळ तालुक्यातील शिक्षकांच्या अनुषंगाने एकूण ०९ मुद्यांची माहिती | आवश्यक माहिती दि.१५.०३.२००९ अखेर अपिलकर्त्यास देण्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यातील अपिले अनुक्रमांक १ ते ५ (क्रमांक २०५३, २०४८, २०४४, २१७७-अ व २८०५ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२. विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयपक्षी एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल

आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. ०६- ०४ - २००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

सौ. बायडाबाई सुभाष पारखी
स.नं.८८/४, प्लॉट नं.१३, गुजरात कॉलनी,
कोथरूड, पुणे-४११ ०३८ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा — उत्तरवादी
उप आयुक्त क्र.१ (बांधकाम नियंत्रण विभाग क्र.१),
पुणे महानगरपालिका, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा
नगर उप अभियंता (बांधकाम नियंत्रण विभाग क्र.११) ,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २०६९+२०७०+२०७१ /पुणे/२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.८.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्त्या -** सौ. बायडाबाई सुभाष पारखी
स.नं.८८/४, प्लॉट नं.१३, गुजरात कॉलनी, कोथरूड, पुणे-४११ ०३८

**अपिलीय प्राधिकारी** - उप आयुक्त क्र.१ (बांधकाम नियंत्रण विभाग क्र.१) ,
पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम

**जन माहिती अधिकारी** तथा नगर उप अभियंता (बांधकाम नियंत्रण विभाग क्र.११) ,
पुणे महानगरपालिका, पुणे यांचे प्रतिनिधी श्री. सुकुमार पाटील

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २०६९ / पुणे | १.४.२००८ | ९.६.२००८ | ३.५.२००८ | -- |
| २०७० / पुणे | २५.३.२००८ | १६.६.२००८ | २.५.२००८ | -- |
| २०७१ / पुणे | १९.३.२००८ | ९.६.२००८ | २.५.२००८ | -- |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

**अपील क्र. २०६९/ पुणे**

श्री. शशिकांत सीताराम चव्हाण, रा. सर्व्हे नं.९४/१/बी/५, इंदिरा शंकर नगरी, पौड रोड, कोथरूड, पुणे-३८ यांच्या बांधकामाचा गुंठेवारी मंजूर नकाशा व दाखल्याच्या सत्य प्रती. श्री. चव्हाण यांनी दि. १.८.२००६ रोजी केलेल्या तक्रारी अर्जावर काय कारवाई केली

**अपील क्र. २०७०+२०७१/ पुणे**

सर्व्हे नं.९४/१/बी/५, इंदिरा शंकर नगरी, पौड रोड, कोथरूड, पुणे येथील जागेत एन.ए. परवानगी घेऊन बांधकाम केले, व त्यानंतर २००१ साली गुंठेवारी मंजूर करून घेऊन बांधकाम नियमित केले. असे असतानाही दि. १.११.२००६ रोजी कोणतीही पूर्वसूचना न देता घराची मुख्य भिंत, खिडक्या, दरवाजे तोडून बेघर केले याबाबत माहिती

## विवेचन

आपल्या घराची भिंत अनधिकृत ठरवून महानगरपालिकेने केलेल्या कारवाईच्या संदर्भात व आपले शेजारी श्री. शशिकांत सीताराम चव्हाण यांच्या गुंठेवारीच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळ्यांवरून चुकीची व असमाधानकारक मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्त्या सौ. बायडाबाई सुभाष पारखी यांनी राज्य माहिती आयोगाकडे तीन अपिले केली आहेत.

इंदिरा शंकर नगरी, कोथरूड, पौड रोड, पुणे येथील जागेच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाहीबाबत सौ. पारखी यांची तक्रार आहे. बांधकामाची परवानगी आधी दिली असताना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता, अन्य व्यक्तींच्या अर्जानुसार कारवाई करून महानगरपालिकेने आपल्याला बेघर केले, अशी त्यांची तक्रार आहे. भिंत पाडण्याची नोटीस आपल्या हातात न देता दुसऱ्याला दिली. ही कारवाई नगरसेवकाच्या दबावाखाली केली व त्याचे नाव आपल्याला दिले नाही,

असे सौ. पारखी यांनी आयोगापुढील सुनावणीत सांगितले. गुंठेवारीमधील नकाशामध्ये भिंत असल्याने रीतसर नोटीस देऊन भिंत पाडली. कोणत्याही नगरसेवकाच्या दबावाखाली ही कारवाई केली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. सुकुमार पाटील यांनी सांगितले. गुंठेवारीव्यतिरिक्त अनधिकृतपणे केलेल्या बांधकामावर ही कारवाई करण्यात आल्याचे सौ. पारखी यांना त्वरित कळविण्यात आले होते, असे जन माहिती अधिकारी यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

सौ. पारखी यांच्या तीन अर्जांवरील माहिती विहित मुदतीत देण्यात आली, त्यांनी अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे अपील केले नसल्यामुळे निर्णयाचा प्रश्न आला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, क्र. १, पुणे महानगरपालिका यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम यांनी सांगितले. अपिलीय प्राधिकारी तथा उपआयुक्त, क्र. १ यांनी लेखी निवेदनाद्वारे त्याबाबतचा तपशील आयोगाला दि.८.८.२००८ रोजी सादर केला.

'घराची भिंत अनधिकृत आहे असे समजून कारवाई केली, त्याची छायांकित प्रत मिळावी,' 'आमच्या मिळकतीस जाण्या-येण्यास रस्ता कोठून आहे,' 'अर्जदार श्री. न्हावले यांचा अर्ज स्वीकारून बेघर केले व अर्जदार हे त्या मिळकतीचे मालक आहेत का व कसे,' 'श्री. शशिकांत सीताराम चव्हाण यांच्या जाण्या येण्याच्या रस्त्याची माहिती व नकाशा मिळावा,' अशा स्वरूपाच्या मागण्या सौ. पारखी यांनी 'माहिती'ची मागणी म्हणून केल्या आहेत. त्यावर दिलेल्या उत्तराने त्यांचे समाधान होत नाही, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा नगर उप अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी केले. शेजाऱ्याच्या गुंठेवारी संदर्भातील कागदपत्रांची मागणी त्यांनी केली असल्यामुळे त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाकडे अर्ज पाठविण्यात आला होता व त्याची प्रत सौ. पारखी यांना पाठविली होती, असेही त्यांनी नमूद केले.

सौ. पारखी यांच्या अर्जाबाबत केलेल्या कार्यवाहीच्या खुलाशासह अहवाल सादर करावा, तसेच संबंधित सर्व कागदपत्रे सौ. पारखी यांना दाखवून हव्या असलेल्या प्रती त्यांना त्वरित द्याव्यात, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला. त्यानुसार शेजाऱ्यांची (श्री. चव्हाण यांच्या) गुंठेवारीची फाईल सौ. पारखी यांना त्यांचे निवासस्थानी जाऊन दि. २२.८.२००८ रोजी समक्ष दाखविण्यात आली व त्यांना आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती देण्यात आल्या आहेत. कागदपत्राची पोहच

देण्यास त्यांनी नकार दिला, असे अपिलीय प्राधिकाऱ्यांचे प्रतिनिधी श्री. प्रवीण गेडाम यांनी आयोगाला दि. २८.८.२००८ रोजी कळविले तर 'अपील क्र.२०६९ मधील प्रश्न १ चे उत्तर आपल्याला मिळाले व प्रश्न २ व ३ चे उत्तर मिळाले नाही. अपील क्र. २०७० व २०७१ मधील कोणत्याही प्रकारची उत्तरे मिळाली नाहीत,' अशी तक्रार सौ. पारखी यांची कन्या दिपाली सुभाष पारखी यांनी दि. २८.८.२००८ रोजी आयोगाकडे केली. मात्र आपल्याला कोणतीही कागदपत्रे मिळाली नसल्याची तक्रार सौ. पारखी यांनी दि. २७.८.२००८ रोजी केल्यानंतर राज्य माहिती आयोगाच्या कक्ष अधिकाऱ्यांसमोर दि. २८.८.२००८ रोजी संबंधित कागदपत्रांची फाईल सौ. पारखी यांना दाखविण्यात आली, त्यांची तक्रार खोटी असल्याचे स्पष्ट करण्यात आले. फाईलमधील कोणतीही कागदपत्रे घेण्यास त्यांनी नकार दिला, असेही अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिनिधी नगर उप अभियंता श्री. गेडाम यांनी आयोगाला लेखी कळविले.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे लक्षात घेता सौ. पारखी यांनी मागितलेली माहिती प्रामुख्याने खुलासेवजा विचारणेच्या स्वरूपाची, तसेच 'माहिती' या व्याख्येत न बसणारी (उदा. 'आम्हांला कोणत्याही प्रकारची सूचना न देता कारवाई करून बेघर केले त्याची माहिती मिळावी' ) अशा स्वरूपाची आहे. कारवाईच्या अनुषंगाने पूरक व स्पष्टीकरणात्मक माहिती देण्यात आली असल्याचे कागदपत्रांवरुन स्पष्ट दिसते. देऊ केलेली कागदपत्रे नाकारणे व कागदपत्रे मिळाली असताना न मिळाल्याची तक्रार आयोगाकडे करणे या बाबी अपीलकर्त्याच्या माहिती मागणीच्या भूमिकेबाबत सांशकता निर्माण करण्यास कारणीभूत ठरणाऱ्या आहेत. महानगरपालिकेने केलेल्या कारवाईबाबत अपीलकर्त्याची तक्रार असल्यास प्रशासकीय मार्गाने त्याबाबत दाद मागण्याचा मार्ग त्यांना उपलब्ध आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कक्षेतील तो विषय नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले अमान्य करण्यात येत आहेत.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८.४.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दत्तात्रय मणप्पा मुलगे
द्वारा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास
उपविभाग क्र.४, पुणे लष्कर पाणीपुरवठा केंद्राचे आवार, पुणे-१ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा
१.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभाग, पुणे-१
२.मुख्य अभियंता(प्रादेशिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मध्यवर्ती इमारत, पुणे-१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
१.कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभाग, पुणे-१
२.सहा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे-१
३.उपअभियंता(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुख्य अभियंता (प्रादे) यांचे कार्यालय, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३०, २६८, २९३, २९४, ६८६, ६८८, ६९०, ६९१, ९५८, १४१३, २३५२, २३५३, २३६४, २३८७, १७३४, २६३४, २६३५, २६३६, २६३७, २६९८, २८१७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १२.६.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय मणेप्पा मुलगे
द्वारा उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास
उपविभाग क्र.४, पुणे लष्कर पाणीपुरवठा केंद्राचे आवार, पुणे-१

**अपिलीय प्राधिकारी** तथा
१.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभाग,
पुणे-१ श्री.एस.जी.आडिवरेकर
२.मुख्य अभियंता(प्रादेशिक), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मध्यवर्ती इमारत, पुणे-१ प्रतिनिधी श्री.एस.जी.आडिवरेकर

**जन माहिती अधिकारी** तथा
१.कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभाग, पुणे-१ श्री.व्ही.जी.जुमले
२.सहा.अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे-१
विद्यमान श्री.आर.एम.पवार, तत्कालीन श्रीमती माधुरी वैशंपायन
३.उपअभियंता(२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण,
मुख्य अभियंता (प्रादे) यांचे कार्यालय, पुणे-१
प्रतिनिधी श्रीमती आर.एन.पवार

| अपील क्रमांक | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख |
|---|---|---|---|---|
| २९३/पुणे /०७ | २८.९.२००६ | १.१२.२००६ | १.११.२००६ | १५.१.२००७ |
| २९४/पुणे /०७ | २८.९.२००६ | २८.९.२००६ | २.११.२००६ | १५.१.२००७ |
| ६९१/पुणे /०७ | ४.११.२००६ | १.१२.२००६ | ५.१२.२००६ | २८.३.२००६ |
| ६८८/पुणे /०७ | १५.१२.२००६ | -- | २२.१.२००६ | -- |
| २८१३/पुणे /०७ | २७.११.२००८ | २५.११.२००८ | २९.११.२००८ | २०.११.२००८ |
| १७३४/पुणे /०८ | ४.१२.२००७ | -- | ९.१.२००८ | २.२.२००८ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३५२/पुणे /०८ | २३.६.२००८ | -- | ४.८.२००८ | १२.९.२००८ |
| २३६४/पुणे /०८ | १६.७.२००८ | १८.७.२००८ | २०.८.२००८ | २०.९.२००८ |
| २६३५/पुणे /०८ | २६.८.२००८ | २४.९.२००८ | २६.९.२००८ | -- |
| २६३६/पुणे /०८ | २८.८.२००८ | २६.९.२००८ | २९.९.२००८ | -- |
| २६३७/पुणे /०८ | २९.८.२००८ | -- | १.१०.२००८ | ७.१०.२००८ |
| २६९८/पुणे /०८ | १७.९.२००८ | -- | २०.१०.२००८ | १७.११.२००८ |
| २६८/पुणे /०७ | ३०.९.२००६ | १.१०.२००६ | ३.११.२००६ | ११.१०.२००६ |
| ६९०/पुणे /०७ | २०.११.२००६ | ४.१२.२००६ | २३.१.२००६ | ९.२.२००७ |
| ६८६/पुणे /०७ | २.१२.२००६ | -- | २४.१.२००७ | १७.१.२००७ |
| ९५८/पुणे /०७ | ११.४.२००७ | -- | २२.५.२००७ | -- |
| २३८७/पुणे /०८ | २५.६.२००८ | -- | १२.८.२००८ | १०.९.२००८ |
| २६३४/पुणे/०८ | ३०.८.२००८ | २३.९.२००८ | ३०.९.२००८ | -- |
| २३०/पुणे /०७ | ४.११.२००६ व १८.११.०६ | २८.११.२००६ | ६.१२.२००६ | -- |
| १४१३/पुणे /०७ | ५.५.२००७ | २०.७.२००७ | ५.७.२००७ | २५.११.२००८ |
| २३५३/पुणे /०८ | २४.६.२००८ | ३१.७.२००८ | ५.८.२००८ | ३१.७.२००८ |

<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>

सोबत परिशिष्ट जोडले आहे.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मणेप्पा मुलगे यांनी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे विविध स्वरुपाची माहिती मागणारे अर्ज केल्यानंतर जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्या पातळीवरुन समाधानकारक माहिती न मिळाल्याच्या व योग्य कारवाई न झाल्याच्या कारणावरुन राज्य माहिती आयोगाकडे २४ अपिले केली आहेत. दि.२८.९.२००६ ते २७.१०.२००८ या काळातील हे मूळ अर्ज असून दि.२२.१.२००७ ते २३.१.२००९ या काळात श्री.मुलगे यांनी राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे २१ अपिले व मुंबई खंडपीठाकडे तीन अपिले केली आहेत.

पुणे खंडपीठाने दि.१२.६.२००८, दि.२७.१०.२००८ व दि.२१.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त यातील काही अपिले समाविष्ट करण्यात आली होती. अपील क्र.२८६, ६८९ व ६९० याबाबत या कार्यक्रमातील चर्चेनुसार कार्यवाही झाली . इतर अपिलांबाबत उभय बाजूंमध्ये एकमत झाले नाही व अपील क्र.२३०, २९३,२९४, २६८, ६८६, ६८८, ६९०, ६९१, ९५८, १४१३ ही अपिले सुनावणीस घेण्यात आली. ऊर्वरित अपिलांमध्ये उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे निर्णयार्थ विचारात घेण्यात आली.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे येथील कार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता, उपअभियंता (२), यांच्याकडे श्री.मुलगे यांनी केलेल्या विविध अर्जांद्वारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातील विस्तृत माहिती मागितली आहे. 'मंडळाकडून कोणत्या प्रयोजनाखाली किती रक्कम आली होती,' 'जमा न करण्याची आर्थिक कारणे कोणती,' 'वजा दाखविणे म्हणजे नेमकी कोणती कारवाई करावयाची होती, याचा खुलासा करावा,' 'अर्जदाराच्या लेखी म्हणण्याप्रमाणे भांडारपाल यांच्यावरील जे जे आरोप सिध्द झाले होते त्या त्या आरोपांबाबतीत श्री.सोनवणे यांना मुख्याधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, पुणे यांनी त्यांचे गोपनीय पत्र १४.५.२००४ नुसार कळविण्याबाबत सूचना देण्यात आल्या, पत्राची मूळ प्रमाणित सत्यप्रत द्यावी,' अशा स्वरुपाच्या 'माहिती'ची मागणी श्री.मुलगे यांनी केली आहे.

यातील काही माहिती देण्यात आली, काही मुळातच उपलब्ध नाही व कल्पित विधानावर आधारित आहे, तर काहीबाबत कळविलेले शुल्क श्री.मुलगे यांनी भरलेले नाही. तरीही उपलब्ध माहिती देण्यात आली, असे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रामध्ये विविध निवेदनाद्वारे लेखी व तोंडी नमूद केले.

'श्री.मुलगे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळातच शासकीय सेवेला असून ते कार्यालयामधीलच माहिती विस्तृत प्रमाणावर व सातत्याने मागत असतात. मुख्यत्त्वे खात्याच्या अंतर्गत लेखापरीक्षण विभागाच्या शेऱ्यांवर आधारित व भ्रष्टाचाराचे आरोप करुन त्याबाबतचा

तपशील मागणारे अशा स्वरुपाचे त्यांचे अर्ज असतात. प्रत्येक अर्जात मुद्दे, उपमुद्दे, भाष्य यांचे प्रमाण मोठे असते. अंतर्गत लेखापरीक्षण विभागाच्या शेऱ्यानुसार कार्यवाहीची माहिती दिली तरी ती खोटी आहे असे आक्षेप ते घेतात. तेच तेच मुद्दे पुनः पुन्हा मांडून पर्यायाने कार्यालयाला, अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना अडचणीत आणण्याचा त्यांचा प्रयत्न असतो,' असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी श्री.एस.बी.बंगाळे, श्री.व्ही.जी.जुमले, सौ.माधुरी वैशंपायन, श्रीमती आर.एन.पवार व अपिलीय प्राधिकारी श्री.एस.जी.आडिवरेकर यांनी लेखी व तोंडी केले. त्या अनुषंगाने पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली. सन १९९४ पासूनची माहिती श्री.मुलगे मागत असल्यामुळे व सातत्याने विस्तृत माहितीची मागणी ते करीत असल्यामुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम होतो, असेही प्रतिपादन श्री.आडिवरेकर यांनी केले.

आपल्यावर अन्याय झाला आहे व कार्यालयात योग्य कारभार चाललेला नाही, भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून योग्य माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.मुलगे यांनी लेखी व तोंडी केले.

श्री.मुलगे हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळामध्ये कनिष्ठ लिपिक या पदावर कार्यरत आहेत. यापूर्वी सन १९९२ ते दि.१०.३.१९९५ या कालावधीत प्राधिकरणाच्या मंडळात व त्यानंतर सन २००४ पर्यंत महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विकास विभागाच्या भांडार शाखेकडे ते कार्यरत होते. मंडळाच्या कार्यालयात सेवेत असताना त्यांच्यासह काही जणांची विभागीय चौकशी करण्यात आली होती. त्यात आपण सादरकर्ता अधिकारी (Presenting Officer)म्हणून काम केले होते, असे अधीक्षक अभियंता श्री.एस.जी.आडिवरेकर यांनी लेखी व तोंडी नमूद केले. विभागीय चौकशीतील निष्कर्षानुसार श्री.मुलगे यांना शिक्षाही झाली होती. त्याविरुध्द त्यांनी उच्च न्यायालयापर्यंत दाद मागितली होती. त्यांनी केलेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश पुण्याच्या विशेष न्यायालयाने पोलीस अधीक्षक, भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग यांना दिले होते. 'श्री.मुलगे यांना झालेली शिक्षा दबाव तंत्राचा वापर केल्यामुळे मागे घेतली जाईल, असे त्यांना वाटले असावे, म्हणून त्यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले असावेत, असे आम्हांस वाटते.

झालेल्या चौकशीवरुन सदर प्रकरणातील तथाकथित भ्रष्टाचारामध्ये काही एक तथ्य नाही. फिर्यादीने सदर प्रकरण अवास्तव फुगवून कोर्टापुढे मांडल्याचे दिसून येते,' असे पोलीस अधीक्षक, भ्रष्टाचार प्रतिबंधक विभाग यांनी दि.१५.१.१९९७ रोजी विशेष न्यायालयापुढे सादर केलेल्या अहवालात म्हटले आहे. या अहवालानंतर न्यायालयाने श्री.मुलगे यांचा दावा फेटाळून लावला. त्यानंतर राष्ट्रपतींपासून विविध पातळ्यांवर श्री.मुलगे आरोप-प्रत्यारोपांचे अर्ज व तक्रारी करीत आले आहेत, असे नमूद करुन श्री.आडिवरेकर यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे, "माहितीच्या अधिकाराची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर तर श्री.मुलगे यांनी त्याचा फायदाच(गैर) घेण्यास सुरुवात केली. त्याखाली त्यांना हवी असलेली माहिती ते अत्यंत क्लिष्ट शब्दात, एकाच अर्जात अनेक मुद्दे देऊन, ज्या कार्यालयाशी संबंधित नाही अशा कार्यालयाकडे माहिती मागून संबंधितांना कसा त्रास होईल या प्रकारे मागत असतात."

आपल्याला हेतु:पुरस्सररीत्या, संगनमताने व कपटाने माहिती देण्यात येत नाही ज्यामुळे वस्तुस्थिती उघड होईल व कर्मचारी /अधिकारी अडचणीत येतील अशी माहिती वगळली (लपविली) जाते, चुकीची अर्धवट, दिशाभूल करणारी माहिती दिली जाते, असे श्री.मुलगे यांनी आयोगाला केलेल्या पत्रव्यवहारात म्हटले आहे. वगळलेली अथवा लपविलेली माहिती म्हणून श्री.मुलगे यांनी विस्ताराने तपशील नोंदविला आहे. मात्र अशा प्रकारे कोणतीही गोष्ट लपविलेली नाही, एवढेच नव्हे, तर श्री.मुलगे यांना अथवा कोणत्याही नागरिकाला आपल्या कार्यालयातील कोणतीही कागदपत्रे कधीही पाहता येतील. श्री.मुलगे यांनीही अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती घ्यावी, असेही त्यांना लेखी व तोंडी अनेकदा कळविले आहे, असे श्री.आडिवरेकर यांनी नमूद केले.

उभय बाजूंची निवेदने व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.मुलगे आपल्याच कार्यालयातील तपशीलवार माहिती विस्तृत व सातत्याने मागत आहेत, अनेकदा मागणीतील तपशिलाची पुनरावृत्ती आहे, तसेच गृहितावर आधारित विचारणा आहे, हे स्पष्ट होते. एवढ्या मोठ्या प्रमाणावर व एवढ्या सातत्याने माहिती पुरविण्याबाबत जन माहिती अधिकारी

श्री.एस.बी.बंगाळे, श्री.व्ही.जी.जुमले, सौ.माधुरी वैशंपायन, श्रीमती आर.एन.पवार व अपिलीय प्राधिकारी श्री.एस.जी.आडिवरेकर यांनी नमूद केलेल्या अडचणी रास्त आहेत. मात्र अपीलकर्त्याला हवी असलेली माहिती उपलब्ध झाली पाहिजे. अभिलेखाच्या अवलोकनाच्या स्वरुपात ती देण्याची तयारी जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दर्शविलेली आहे. हे लक्षात घेता अपीलकर्ता श्री.मुलगे यांनी अभिलेखाचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेणे अधिक योग्य ठरेल. एकाच व्यक्तीसाठी व क्वचितप्रसंगी त्याच त्या मुद्दयांची पुनरावृत्ती असलेली कागदपत्रे /अर्ज / अपिले हाताळण्यात व त्यावरील कार्यवाहीत सर्व यंत्रणेचा वेळ व श्रम वाया जाता कामा नयेत. तसे करण्यास कारणीभूत होणे हा माहितीच्या अधिकाराचा योग्य वापर म्हणता येणार नाही व ठरणार नाही, याची जाणीव अपीलकर्ता श्री.दत्तात्रय मणेप्पा मुलगे यांना देण्यात येत आहे.

पूर्ण माहिती प्राप्त झाल्याच्या श्री.मुलगे यांच्या निवेदनानंतर आयोगाने अपील क्र.२८६ व ६८९ निकाली काढलेली आहेत. अपील क्र.६९० मध्ये आपल्याला पूर्ण माहिती मिळाली असून तक्रार राहिलेली नसल्याचे श्री.मुलगे यांनी नमूद केले आहे. ऊर्वरित १८ अपिलांबाबत अभिलेख अवलोकनाचा व त्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती अपीलकर्त्यास देण्याचा मार्ग उभय बाजूंनी अवलंबावा. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी वेळोवेळी तशी तयारी दर्शविली असून अपीलकर्त्याला आवश्यक वाटल्यास त्याचा लाभ घेता येईल.

## आदेश

(१) अपील क्र.२८६ व ६८९ बाबत पूर्वी आदेश देण्यात आले असून ऊर्वरित सर्व १९ अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(२) जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास संबंधित अभिलेख अवलोकनास उपलब्ध करुन द्यावेत व त्यातील हवी असलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२०.४.२००९